जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो-३/ ६२७ /२०२१
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली-४१५ ७१२, जिल्हा रत्नागिरी.
दिनांक : 09 MAR 2021

**विषय : संशोधन संचालनालय शाखेकरीता कंत्राटी पध्दतीने कामे करणेबाबत...**

संशोधन संचालनालय, दापोली अंतर्गत **"विविध कंपन्यांचे उत्पादन चाचणी शुल्क (Product Testing)"** या योजनेतील कामे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी **दिनांक २३/०३/२०२१** पर्यत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ संशोधन सहाय्यक | एम. एस्सी, (कृषि, उद्यानविद्या, वनशास्त्र) | विविध कंपन्यांना दुरध्वनी, ईमेल तसेच पत्रव्यवहार द्वारा संपर्क करणे, माहिती देणे कंपन्यांमधून आलेले उत्पादन चाचणी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करणे. चाचणी शुल्क तपासन मंजूरीसाठी सादर करणे, चाचणी घेण्याविषयी पत्रव्यवहार करणे. विद्यापीठ शास्त्रज्ञ व कंपन्यांना पत्रव्यवहार करणे, उत्पादन कंपन्यांबरोबर आवश्यक पाठपुरावा करणे, विद्यापीठ शास्त्रज्ञांकडून प्राप्त झालेले चाचणी अहवाल मंजूरी घेऊन कंपनी.संस्था यांना पाठविणे व चाचण्यांचे दस्तऐवज तयार करून जतन करण्यासाठी सादर करणे. तसेच वरीष्ठांनी सांगितलेली संशोधन संचालनालयातील संशोधन संचालनालयांतर्गत इतर संलग्न कामे करणे. |
| २. | लिपीक टंकलेखक | पदवीधर (कला, वाणिज्य, विज्ञान) किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण, मराठी टापपिंग ३० श. प्र. मि. आणि इंग्रजी टायपिंग ४० श. प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण, एम. एस. सी. आय. टी. अनुभव असणा-यास प्राधान्य | विविध कंपन्यांना करावयाचा पत्रव्यवहार टाईप करणे, ई-मेल करणे, टेस्टींगचा हिशीब ठेवणे, रजिस्टर ठेवणे, टेस्टिंग बाबतची माहिती जतन व अपडेट ठेवणे. वरीष्ठांनी वेळोवेळी दिलेली कामे करणे. |

**उपरोक्त पदे भरण्यासाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे :**

१. उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादा ही शासन धोरणानुसार खुल्या प्रवर्गातील उमेरवारांसाठी १८ ते ३८ वर्ष आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४२ वर्ष राहील.

२. सदर ठेका अकरा महिने कालावधीकरीता राहिल.

३. उमेदवाराचे संशोधन संचालनाल शाखेतील कामकाजाचे स्वरुप, कामाची उरक अणि अचूकता इ. बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सदर ठेका रद्द करण्यात येईल.

४. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचीका क्र. एसएलपी-५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

५. दरपत्रक सादर करताना **प्रतिमहा एकत्रित दर** नमूद करावा.

५. दरपत्रक सादर करताना लिफाफ्यावर **"Product Testing योजनेमध्ये ठेका पध्दतीने काम करण्याचे दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

६. वरील प्रमाणे ठेका पध्दतीने काम करण्यासाठी उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, टकंलेखन व संगणकीय कामकाजाचे अनुभव व इतर अर्हता याबाबतची कागदपत्र जोडून उपरोक्त कामे करण्यासाठी अपेक्षित **प्रतिमहा एकत्रित दर** नमूद करुन दरपत्रक **दिनांक २३/०३/२०२१** पर्यत निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयाकडे सायंकाळी ५.३० वाजेपर्यत सादर करावेत. कामाचा अनुभव, सबंधीत विषयाचे ज्ञान आणि शैक्षणिक पात्रता या बाबी ठेका निश्चित करताना विचारात घेतल्या जातील.

(प. म. हळदणकर)
**संशोधन संचालक**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) प्रमुख, कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र (AKMU), डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२/- त्यांना कळविण्यात येते की सदर नोटीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२) विद्यापीठ नोटीस बोर्ड

३) दापोली नगरपंचायत दापोली जि. रत्नागिरी

४) ग्रामपंचायत गिम्हवणे ता. दापोली जि. रत्नागिरी

५) ग्रामपंचायत जालगाव ता. दापोली जि. रत्नागिरी
२/- त्यांना कळविण्यात येते की सदर नोटीस आपल्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.